**मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्र. व्यअप्र-२००८/प्र.क्र.११५/ का.१२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०९ जुलै, २००८.

**वाचा** :- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२, दि. २७.५.२००३.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.सुएसजी-२००३/(८५/०३)/विशि-४, दि. २४.९.२००३.
३) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र. एमईडी-१००३/ सीआर-५०४/ भाग-३/२००३/शिक्षण-२, दि.२५.११.२००३.
४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. टीईएम-२००३/(२४९/०३)/तांशि-१, दि.१२.५.२००४.
५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.व्यअप्र-२००६/प्र.क्र.१३४/का.१२ दि. १६ मार्च, २००७.
६) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टिएम-२००६/(४२९/०७)/तांशि-१, दि.२.११.२००७.
७) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र.इबीसी-२००५/ प्र.क्र.२१३/मावक-२ दि. २ नोव्हेंबर, २००७.
८) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. व्यअप्र-२००६/प्र.क्र.१३४/ का.१२, दिनांक १८ फेब्रुवारी, २००८.
९) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टिईएम-२००८/(१८४/०८)/तांशि-१, दि. ३० जून, २००८.

**प्रस्तावना** :- मा.सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.ए.पै.फाऊंडेशन विरुध्द कर्नाटक शासन प्रकरणी दिनांक ३१ ऑक्टोबर, २००२ रोजी दिलेल्या निकालपत्रामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याचे अधिकार संबंधित शैक्षणिक संस्थांना प्राप्त झाले. सन २००३-०४ पासून मुक्त जागा व मूल्याधारित जागा अशी विभागणी असणारी संकल्पना अस्तित्वात राहिली नाही. त्यामुळे खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती



Put up on net urgently
D-2
&
D-2A

करण्याची योजना सन २००६-०७ व सन २००७-०८ करिता लागु करण्यात आली होती. सदर योजना शैक्षणिक वर्ष सन २००८-०९ करिता देखील लागु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २००८-०९ या वर्षी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सन २००६-०७ व सन २००७-०८ या वर्षामध्ये घेतलेला निर्णय सदर वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीपर्यंत लागू राहील.

२. हे आदेश खाजगी मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी व्यवस्थापन कोटयातील प्रवेश वगळून सन २००८-०९ यावर्षी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत लागू राहतील.

अ) आरोग्यविज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी,आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत पदविकांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.

३. शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित, अध्यापक विद्यालय (डी.एड) व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या अध्यापक महाविद्यालयामध्ये (बी.एड) शिक्षण घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती सध्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित डी.एड व बी.एड च्या अभ्यासक्रमांना शासकीय दराप्रमाणे करण्यात येते. तेथे ती पुढे चालू ठेवण्यात यावी.

४. सदर योजना सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहील.

५. या योजनेचा लाभ शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी देय राहील. सदर योजनेचा लाभ संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या ( Institutional Level Quota) प्रवेशास व राज्य शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेव्यतिरिक्त अन्य परिक्षेद्वारे प्रविष्ट विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

६. वैद्यकीय शाखेत प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने तसेच असोसिएशनमार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही सवलत लागू असेल.

७. ही योजना अभिमत विद्यापिठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सवलत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

८. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क व इतर शुल्काच्या १०० टक्के दराने प्रतिपूर्ती करण्यात यावी.

९. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येवू नये.

१०. याबाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - राज्य योजनांतर्गत योजना - (१४)(०१) वैद्यकीय तत्सम अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या (२२२५ ३५२९) ४०-शिष्यवृत्त्या व विद्यावेतन खाली मंजूर करण्यात येणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

११. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashrtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००८०७०९१४२३१९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ. मु. अस्वले )
उप सचिव

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई

सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक , तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागा, मंत्रालय, मुंबई
कृषि व पशुसंवर्धन, दुगधव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई
महासंचालक , माहिती व जनसंर्पक संचालनालय, मुंबई
संचालक समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, ~~मुंबई~~ पुणे
आयुक्त आदिवासी विकास, नाशिक
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व संबंधित मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, (उ.व तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक
कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
निवडनस्ती.

---------